# <u>बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे फेब्रुवारी २०११</u>

## <u>आर.सी.एफ पोलीस ठाणे गु.र.क्र.२२/११ कलम ३६४,३०२,२०१ भा.दं.वि.</u>

१) गु.र.क्र व कलम — आर.सी.एफ. पोलीस ठाणे २२/११,
कलम ३६४, ३०२,२०१ भा.दं.वि.

२) गु.घ.दि व वेळ — दिनांक ०६.०२.२०११ रोजी १७.४५ वा. पुर्वी

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक ०६.०२. २०११ रोजी

४) गुन्हा उघड दिनांक — दिनांक १३.०२.२०११ रोजी

५) फिर्यादी — हरीप्रसाद लालताप्रसाद माली रा.ठि. हशुआडवाणी नगर,न्युभारत नगर,वाशीनाका चेंबुर,मुंबई ७४

६) बळीत — **मयत जोगिंदर हरीप्रसाद माली वय १० वर्षे,**

७) आरोपी अटक — कपिल मिसरी माळी

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — दि.०६/०२/११ रोजी दुपारी ०४.३० वा. कॅलीको कंपनीच्या आवारातील जंगलात जोगिंदरचा मृतदेह चेहरा व डोकीचा भाग गंभीर जखमी अवस्थेत मिळून आला. पोलीसांसमक्ष फिर्यादी यांनी मृतदेह त्याचा मुलगा जोगिंदर यांचा असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील आरोपी विषयी काही एक माहिती नसताना पोलीस पथकाने फिर्यादीचे आरोपीसोबत घटना घडण्यापुर्वी भांडण झाले असल्याची माहिती प्राप्त करुन यातील आरोपी कपिल मिसरी माली याचेवरील संशय त्याने घटनास्थळी ट्रकची चावी टाकुन पळ काढल्याने बळावला म्हणून त्याचेवर पाळत ठेवून त्यास ताब्यात घेतले व त्याच्याकडे केलेल्या तपासात माहिती मिळाली की, तो महिन्याभरापुर्वी बिहार येथून मुंबईत आला. १० दिवसापुर्वी मयताचे घरी गेला असता त्या कुटुंबातील सर्वानी त्यास शिवीगाळ केली होती. त्यानंतर मयत मुलगा जोगिंदर हा आरोपीस दिसेल तेव्हा शिवीगाळ करीत असे त्याचा राग आरोपीस होता. म्हणून आरोपीने मयत जोगिंदर यास खाऊसाठी पैसे देतो अशी लालच दाखवून कॅलीको कंपनीचे आवारातील जंगलात नेवून त्याच्या डोक्यात दगड घालून निर्घुण हत्या केली.

**एकंदरीत यातील आरोपीवर निर्माण झालेला संशय आणि पोलीस पथकाने कौशल्याने आरोपीकडे केलेल्या तपासात गुन्हा उघडकीस आला.**

आर.सी.एफ. पोलीस ठाणे मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायिक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने

**मा.पोलीस आयुक्तांनी त्यांना फेब्रुवारी — २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हे शोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

**तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे.....**

१) वपोनि. शिरीष शेळके/आरसीएफ पोलीस ठाणे.

२) पोनि. प्रसाद धारिया/ आरसीएफ पोलीस ठाणे.

३) पोउनि.भापकर / आरसीएफ पोलीस ठाणे.

४) पोहक्र.२२७०५/त्रिंबके / आरसीएफ पोलीस ठाणे.

५) पोनाक्र.२४७१८/यादव / आरसीएफ पोलीस ठाणे.

६) पोनाक्र.२८२१९/पाडाळे / आरसीएफ पोलीस ठाणे.

७) पोशिक्र.९७०९४७/पंचरस/ आरसीएफ पोलीस ठाणे.